**बेरोजगारीवर उत्तम उपाय -- रेशीम उद्योग**

महाराष्ट्र टाईम्स
दिनांक ३०.१०.९०

गेल्या दहा वीस वर्षात महाराष्ट्रात व देशांतही व उद्योग व्यवसाय झपाट्याने वाढले पण बेरोजगारीची समस्या अजूनही आ वासून उभीच आहे. दारिद्रय निर्मूलनाच्या योजनांना प्राधान्य मिळाले, तरी गरीबी हटाओ सारख्या घोषणा देऊनही गरीबी हटली नही. एकीकडे उद्योजकांना स्पर्धेत टिकून रहायच असेल तर मोठ्या, व त्याहून मोठया प्रमाणांत भांडवाली गुंतवणूक करावी लागते. तीन ते पांच कोटी गुंतवणूक करणारा कारखानदारही आज छोटा कारखानदार समजला जातो - एवढया मोठया गुंतवणुकीसाठी *सरकारी बैंकाचे सहाय्य फार मोठया प्रमाणावर मिळू शकते.* तशीच सरकारी मदत (अनुदान) देखील. तरी पण रोजगार निर्मितीसाठी सरकारला या गुंतवणकीचा फारसा उपयोग होत नाही. लघु उद्योगांच्या क्षेत्रांत एका व्यक्तिसाठी रोजगार निर्माण करायला दोन ते तीन लाख रूपये भांडवली गुंतवणूक सहज लागते. मोठ्या उद्योगात हे प्रमाण याहूनही व्यस्त आहे.

एकीकडे ही परिस्थिती तर दुसरीकडे बेरोजगारीचा फुगत चाललेला आकडा. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना पूरक आर्थिक उतपन्न मिळवून देण्याच्या उद्देश्याने सुरु केलेल्या एकात्मिक ग्रामीण विकास योजनेसारख्या कार्यक्रमांना म्हणावे तसे यश आलेले नाही. अशा परिस्थितीत जर ग्रामीण विकास विभाग अणि उद्योग विभाग या दोघांच्या कार्यक्रमांची एकत्र सांगड घातली तर सरकारला रेशीम उद्योगाचा कल्पकतेने वापर करून रोजगार निर्माण करणे मोठया प्रमाणावर शक्य होईल.

रेशीम उद्योगाची आपल्या देशांत फार जुनी परंपरा आहे. महाराष्ट्रीय पैठणी साडी बरोबरच बंगाल, काश्मीर, कांजीवरम्, मैसूर, बनारस अशी रेशीम उद्योग व रेशीम व्यापाराची प्रसिद्ध ठिकाणं पूर्वापार गाजलेली आहेत. आज मात्र संपूर्ण भारतातील सत्तर ते ऐंशी टक्के उत्पादन आणि विशेषतः निर्यात कर्नाटकांतून होते. किंबहुना असे म्हटले पाहिजे की कर्नाटकांत या व्यवसायातील निरनिराळया प्रक्रियांकडे लक्ष देऊन त्यांच जस नियोजन करण्यांत आल तसा प्रकार इतर राज्यांत झालेला नाही. त्यामुळे इतर ब-याच राज्यातून जरी रेशीम उद्योग चालू असला व जरी त्यांतून गोरगरिबांना रोजगार मिळत असला तरी तो रोजगार अक्षरशः पोटापुरताच पुरतो — त्यातून कुणीही गरीबीच्या परिस्थितीतून निघून मध्यमवर्गीय स्थितीत आला नसावा. कर्नाटकाने मात्र या व्यवसायातील विभिन्न प्रक्रिया लक्षांत धेऊन त्यामधे सुधारणा करून, व्यापारी तत्वांशी या व्यवसायाची सांगड घालून मोठी मजल मारली आहे व या व्यवसायातील किमान पन्नास टक्के मंडळीना तरी निश्चितच सुबत्ता मिळवून दिली आहे. आपल्याकडेही हेच किंवा याहून चांगल कांही करता येईल का हा प्रश्न आहे व मला तरी त्याचे उत्तर होय असेच वाटते.

रेशीम उद्योगाकडे आपण कोणत्या दृष्टिकोणांतून पहायचे हे आपण पहिल्यांदा ठरवले पाहिजे. उत्तम परकीय चलन मिळवून देणारा व्यवसाय हे याचे एक रूप तर बेरोजगारीचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर सोडवू शकणारा व्यवसाय हे याचे दुसरे रूप. शिवाय या दोन्ही उद्देशांची सांगड घालता येऊ शकते हा ही एक प्लस पॉईंट.

रेशीम उद्योगाची सुरूवात शेतक-याच्या शेतापासून होते. जगांत रेशीम निर्माण करणा-या चार प्रकारच्या किडयांच्या जाती आहेत व त्यांनी बनवलेले चारही प्रकारचे सिल्क फक्त आपल्याच देशांत आढळून येते. हे किडे - सुरवंट अवस्थेत ठराविक झाडांची पानं खातात. नंतर कोष विणून त्यांच्या आत जातात - त्या अवस्थेतच त्यांचे शरीरांतर होऊन फुलपाखरु बनते व ते कोष फोडून बाहेर पडतात. पुढे यातील नर व मादी फुलपाखरांचे मीलन होऊन पुनः त्याच झाडाच्या पानांच्या खालच्या बाजूला अंडी घातली जातात. हे चार प्रकार आहेत तुतीपासून बनलेले सिल्क, टसर सिल्क, मोंगा मिल्क आणि एरी सिल्क. सर्वात लोकप्रिय व मोठया प्रमाणात निर्मिती होणारे तुती किंवा मलबेरी सिल्क. याचे सुरवंट तुतीच्या पानांवर पोसले जातात. मोंगा सिल्क फक्त आसामांत सोम साल जातीच्या झाडावर तयार होते. एरी सिल्कचे सुरवंट एरंडाच्या पारांवर पोसले जातात व हे सिल्क ओरिसा, आसाम व बिहार मधेच तयार करतात -- इतरत्र त्याचा विशेष प्रसार नाही. टसर सिल्क चे सुरवंट अर्जुन, साल, हिरडा, अशा काही ठराविक वृक्षांवर पोसले जातात व याचा प्रसार विदर्भ, मध्य प्रदेश, ओरिसा व बंगाल मधे जास्त आहे. विदर्भात टसर निर्मिती करणारा मोठा उद्योजक म्हणजे विदर्भ विकास महामंडळ. मात्र सर्व देशभर मोठया प्रमाणावर रुजलेले रेशीम म्हणजे तुतीच्या पानांवर पोसलेल्या सुरवंटांच्या श्रमांतून बनलेले सिल्क. याला कारणही तसेच आहे.

तुतीची लागवड शेतकारी आपल्या शेतात मोठया प्रमाणावार करू शकतात. तुतीच्या बागायती शेतीतून एकरी वीस हजार पर्यंत व जिराइती मधून देखील एकरी दहा ने वीस हजार पर्यंत उत्पन्न मिळू शकते. या उलट टसर, एरि किंवा मोगा सिल्कचे कोष जंगलातून किंवा झाडावरुन गोळा करावे लागतात.

मात्र शेतक-याने तुतीचे पीक घ्यायचे- त्यावर किडे पोसायचे, त्यांना पंचवीस-तीस दिवस जोपासायचे. तयार होणारे कोष गोळा करायचे व पुढे त्यांचे काय करायचे हा प्रश्न शेतक-याला किंवा सरकारला पडणार असेल आणि पुढची कांहीच व्यवस्था आपल्याकडे नसेल तर शोतक-याचा व्यवसाय मूळ धरू शकत नाही हे खादी ग्रामोद्योग मंडळाच्या गेल्या वीस-पंचवीस वर्षांच्या अनुभवावरून सिद्ध झाले आहे. कोष निर्मितीनंतर जे कांही करावे लागते ते शेतकरी करू शकत नाही कारण तो वेगळाच व्यवसाय आहे.

म्हणूनच शेतक-यांच्या बरोबरीने आणखीन कोणकोणत्या व्यवसायांना रेशीम उद्योगामुळे चालना मिळू शकते ते आपण पाहू या. कोष बनवण्याच्याही आधी कांही शेतकरी आपल्या शेतात मोठ्या प्रमाणावर तुतीची लागवड करून त्या झाडांची कटिंग्ज जुलै ते सप्टेबर या काळांत इतर शेतक-याना विकू शकतात. सध्यातरी कटिंग्ज विक्रीच्या व्यवसायांत खादी ग्रामोद्योग मंडळाचे सहाय्य घेणे फायद्याचे ठरेल. एरवी महाराष्ट्रात शेतक-यांना ही कटिंग्ज कर्नाटकांतून आणावी लागतात. थोडक्यांत नर्सरीचा व्यवसाय करना येईल.

अंडीपुंज निर्मिती व विक्री हा असाच दुसरा फायदा देऊ शकणास व्यवसाय. कोष फोडून बाहेर निघलेल्या फुलपाखरांचे मिलन झाल्यानंतर त्यांतील मादी एका जागी बसून अंडी घालते. ही अंडी रोगमुक्त आहेत किंवा नाहीत हे आपल्याला थोड्याशा उपकरणांच्या सहाय्याने तपासून पहाता येते. रोगमुक्त सर्टिफाइड अंडी इतर इच्छुक शेतक-यांना विकता येतील. रोगमुक्त अंडी नसल्यास त्याचा एकूण रेशीम उद्योगवरच मोठा वाईट परिणाम होऊ शकतो. म्हणून केंद्रीय रेशीम बोर्डाच्या परवानगीनेच किंवा शासनामार्फतच ही केंद्र चालवातीत असा निर्बंध आहे. तसे का असेना-तरी या केंद्रांमधूनही रोजगार निर्मिती होते.

अंडयातून निघालेले किडे जेव्हा तुतीच्या पानांवर पोसले जात असतात तेव्हा त्यांना ठेवण्यासाठी लागणा-या बांबूच्या विविध वस्तू उदाहरणार्थ ट्रे, चंद्रिका, नेट्स या साठी देखील ग्रामीण भागात मोठी रोजगार निर्मिती होते.

कोष निर्मितीनंतरचा मुख्य व्यवसाय म्हणजे कोषातून धागा काढणे. हे काम मोठी स्पिनिंग मिल उभारून पण होऊ शकते व छोट्या छोट्या प्रमाणावर शेकडो व्यक्तींना रोजगार मिळवून देऊन पण होऊ शकते. जी गोष्ट कापसाच्या धाग्यापासून कापडापर्यंतच्या यात्रेची तीच रेशीमाचा धागा काढण्यापासून रेशीम कपडा तयार करेपर्यंतची. इथे हँडलूमलाही वाव आहे आणि पॉवरलूमलाही. मात्र या क्षेत्रात अजून मोठ्या प्रमाणावर मशीनीकरण झालेले नाही. त्यामुळे अगदी छोट्या उद्योजकापासून म्हणजे सहा कॉटेज बेसिनचे एक युनिट वापरणा-यापासून तर वीस बेसिनची दहा बारा युनिट्स बाळगणारे आणि त्यावर धागा कातणारे देखील या व्यवसायांत दिसून येतात. इथे कुटीर उद्योगाची मर्यादा संपते. मोठया प्रमाणावर स्पिनिंग करण्यासाठी छोटीशी फॅक्टरी सुरू करायची म्हटली तरी त्यासाठी लागणारी मशिनरी बाजारांत उपलब्ध आहे. धागा निर्मितीचे काम अतिशय कौशल्याचे आहे व त्यांतील बारीक सारीक चुकांमुळे मालाचा भाव कमी होऊ शकतो. मात्र धागा उत्तम निघाल्यास मालाचा भावही तेवढाच समाधानकारक असतो.

सध्या छोट्या प्रमाणावर सूत काढण्याचे प्रशिक्षण खादी ग्रामोद्योग मंडळामार्फत वाईला दिले जाते तर पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळामार्फत मडहिंग्लजला व विदर्भ विकास महामंडळामार्फत नागपूरला. या व्यवसायाच्या प्रशिक्षणासाठी ग्रामीण विकास व रेशीम विभाग यांनी एकत्र यायचे ठरवले तर प्रत्येक जिल्हयांत ट्रायसेम योजनेखाली हे प्रशिक्षण वर्ग सुरू करता येतील. यासाठी ट्रेनिंग वर्ग उभारावे लागतील, मशिनरी आणावी लागेल आणि प्रशिक्षक शोधावे लागतील. पण हे सर्व आयोजन IRDP मधून करता येईल.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर धागा निर्मितीची यंत्र बसवायला जो भांडवली खर्च येतो तो लघुउद्योग समजला जातो आणि ज्या त्या भागातल्या विकास महामंडळातर्फे अशा उद्योजकाला EPP योजनेखाली पंचवीस टक्के अनुदान मिळते. शिवाय package scheme of incentive (PSI) या खाली मिळणा-या सवलतींना देखील तो पात्र ठरतो.

धाग्यावर मजबूतीसाठी वेगवेगळया प्रक्रिया कराव्या लागतात. साधारणपणे धागा बनवणा-या दहा युनिट्स मागे doubling, twisting, throwing या प्रक्रियांचे एक युनिट चालू शकते. याला देखील EPP व PSI खालील सवलती मिळू शकतात. खरेतर IRDP खालील सवलती पण मिळू शकतात. फरक हाच की EPP मधील सवलतीसाठी दारिद्र्य रेषेखाली असण्याची अट नाही, व एकूण सवलती देखील जास्त आहेत. मात्र कर्ज घेण्यासाठी बँकेकडे तारण द्यावे लागते. IRDP मधील सवलत घेण्यासाठी तारण द्यावे लागत नाही.

धाग्यांना रंगवणे हाही एक मुख्य व्यवसाय आहे. तरीही येवल्यातील रंगारी समाजाची एकूण उपेक्षा पहिल्यानंतर या क्षेत्रांतही सरकारने खूप कांही करण्याची गरज आहे हे पटले. या रंगारी व्यावसायिकांना त्यांच्या रंगकामाच्या धंद्यातील नवीन मशिनरीची माहिती नाही-पक्के रंग बनवण्यासाठी लागणारे खेळते भांडवल पुरेसे उपलब्ध नाही. रंगारी तंत्रात ज्या सुधारण झाल्या त्यांची माहिती नाही. हे skill upgradation चे काम IRDP मार्फत नाही तरी शासनाच्या व्यवसाय शिक्षण विभागाकडून होऊ शकते. तसे झालेले नाही हे मात्र खरे.

यामुळे आपल्या कडे रेशमाच्या रंगारी कामाची पूर्व परंपरा असूनही आज विश्वासनीय कामासाठी आपल्याला बंगलोर पर्यंत जावे लागते. त्यामुळे हा व्यवसाय महाग पडतो.

रेशीम धाग्यापासून कापड विणण्याचा व्यवसाय देखील महाराष्ट्रांत अगदी थोडया प्रमाणावरच आहे व आहे तो सर्व हातमागावर. तरी देखील या व्यवसायाला चांगले दिवस आहेत कारण देशांतील बहुतेक सर्व रेशीम कपडा हातमागावरच विणला जातो- मोठया मिल्स थोडयाच आहेत. कापड उद्योगाप्रमाणेच या मधे सुद्धा छोटे छोटे पॉवरलूम टाकणे, बीम भरून देणे असे उद्योग सुरू करता येतील. या सर्व व्यवसायांना लघु-उद्योगांना मिळणा-या सवलती लागू आहेत. कापड विणल्यानंतर पुढे प्रिटिंग, ड्रेस मेकिंग इत्यादि व्यवसाय देखील सुरू होऊ शकतील.

मात्र रेशीम उद्योगाच्या बाजारात दलाली व चढ उतार खूप आहेत. दलाली मोठया प्रमाणावर वाढून सर्व नफा दलालांकडेच अशीही परिस्थिती येऊ शकते. यासाठी कर्नाटक शासनाने केलेली उपाययोजना वाखाणण्या सारखी आहे. रेशीम कोष हा नाशवंत असल्याने तो तत्काळ विकला जावा व शेतक-याला भाव मिळावा या साठी निरनिराळया ठिकाणी दररोज रेशीम कोषांचे लिलाव केले जातात व लिलावांत सरकार देखील सहभागी होऊन शेतक-याला निदान हमी किंमत मिळेल याची काळजी घेते. मात्र सर्व कोष विकत घेण्याचे व मोनोपोली पर्चेसिंगचे सरकारी धोरण नाही हे मुद्दाम लक्षांत घेण्यासारखे आहे. रेशीम कोषांची उलाढाल करणारे रामनगरम हे एशियातले सर्वात मोठे केंद्र आहे.

याच बरोबर कर्नाटक राज्यात काही मुख्य ठिकाणी (व विशेषतः बंगलोर येथे) सिल्क एक्सचेंज देखील आहे. इथे साधे सूत, प्रक्रिया केलेले सूत, रंगवलेले सूत यांची ओपन लिलावाने विक्री सतत चालू असते. व त्यांतही राज्य शासनाचे KSIC हे मंडळ सहभागी असते. हे मंडळ सुताच्या एकूण उत्पादनापैकी फक्त दहा ते पंधरा टक्के सूतच विकत घेते. मंडळाची उत्पादन क्षमता तेवढीच आहे व ती जाणून बुजून वाढवलेली नाही. हेतू एवढाच की खाजगी क्षेत्रांना मर्यादित स्पर्धा असावी व सूत काढणा-यांना किंमतीची काहीतरी हमी मिळावी. सिल्क एक्सचेंज मार्फत गि-हाईकांना व विक्रेत्यांना दिल्या जाणा-या एकूण सुविधा व सवलतींची एक मोठी यादीच होईल. तरी देखील मंडळाचे व्यवहार नफ्यांत चालतात यावरून त्यांची कार्यक्षमता दिसून येते तसेच रेशीम उद्योग फायद्यांत जातो हे ही कळते.

असा हा रेशीम उद्योग महाराष्ट्रांत वाढवायचा असेल व त्यातून कांही प्रमाणावर का होईना रोजगार निर्माण करायचा असेल तर शासनाने याचे योग्य नियोजन केले पाहिजे. शेतक-यांना वेळच्या वेळी कटिंग्ज व रोगमुक्त अंडी पुरवणे व त्यांच्याकडून वेळच्या वेळी योग्य भावांत कोष विकत घेण्याची कारवाई अधून मधून होत असते. तरी पण कोष निर्मितीनंतर सुरू होऊ शकणारे इतर व्यवसाय वाढविण्यासाठी, त्यांचे व्यवसाय प्रशिक्षण देण्यासाठी व त्यांना कर्जपुरवठा होईल यासाठी अजून बराच पल्ला गाठायचा आहे. ज्या ठिकाणी रिसर्च व skill upgradation आवश्यक आहे तिथे सरकारी सहाय्य अपेक्षित आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर रांची येथील रिसर्च इन्स्टिट्यूटला प्रयोगांत असे दिसून आले की जे एरि सिल्क सर्व रेशिमांमध्ये निकृष्ट समजले जाते, जाडे भरडे असते, तेच योग्य प्रमाणांत तूती सिल्कच्या धाग्याबरोबर ब्लेंड करून वापरल्यानंतर एकदम एक्सपोर्ट क्वालिटीचा माल तयार झाला. असे प्रयोग करून बघणे त्या गरीब एरि सिल्क उत्पादकाला शक्यच

झाले नसते. दुसरे उदाहरण पण आहे- विदर्भ महामंडळाने प्रयत्न पूर्वक नवीन व आकर्षक प्रिंट्स शोधून मालाचा खप जोरदार वाढवला. एक तिसरे उदाहरण मुद्दाम नमूद करण्यासारखे आहे. इतर सर्व कोषांपासून धागा काढतांना सलग धागा मिळावा म्हणून आधी ते कोष पाण्यांत उकळवतात. यामुळे आतील किडा मरतो. एरवी तो किडा कोष फोडून बाहेर आला असता तर त्यामुळे प्रत्येक धागा तुटला असता व फक्त टकळी वरच सूत काढणे जमू शकले असते. मशीनवर जमले नसते. मात्र एरि सिल्कच्या कोषाचे सूत जाड असल्याने टकळीवरच काढावे लागते. त्यामुळे हे किडे बाहेर येइपर्यंत वाट पाहून मगच धागा कातला जातो. मध्यंतरी काही देशांमधे किड्यांचा संहार घडवून आणते म्हणून सिल्क वापरू नका असा प्रसार करायला सुरूवात केली होती. त्यांना एरि सिल्कची माहिती दिल्यानंतर व त्यांत किडा मारला जात नाही हे पटवून दिल्यानंतर हे सिल्क आम्हाला कुठे विकत मिळेल अशी कित्येकांनी विचारणा केली.

शेवटी रेशीम हा अतिशय नाजूक धागा आहे. त्यामुळे त्याच्या उत्पादनात दर्जा सांभाळणे फार महत्वाचे आहे. शासनामार्फत जे प्रशिक्षण वर्ग चालवले जातात त्यामध्ये दर्जा सांभाळण्याचे तंत्र देखील शिकवले गेले पाहिजे. तसेच ज्यांना प्रशिक्षण मिळाले त्यांनी व्यवसाय सुरू करावा यासाठी जे नियोजन करावे लागेल त्याचा पण विचार केला पाहिजे.

मुख्य म्हणजे बाजारभावातील अनपेक्षित चढ-उतारामुळे शेतक-यांना किंवा लघु व्यावसायिकांना झळ पोचून ते पार गाडले जाऊ नयेत यासाठी आवश्यक ती यंत्रणा पण शासनानेच उभी केली पाहिजे. यासाठीच कर्नाटकाच्या उदाहरणावरुन आपण कांही तरी शिकले पाहिजे. तिथे सात वर्ष सेक्रेटरी सिल्क इंडस्ट्री या पदावर राहून वरील सर्व त-हेच्या सुधारणा धडवून आणणारा अधिकारी आज जागतिक कीर्तिचा सिल्क तज्ज्ञ मानला जातो.

रेशीम उद्योगांतील कित्येक परदेशी तंत्रज्ञ त्यांचे तंत्र व मशिनरी आपल्याकडे निर्यात करू इच्छितात. त्याही बाबत शासनाने योग्य तो विचार आताच केला पाहिजे. असे झाल्यास रेशीम उद्योगाचा उपयोग आपल्याला मोठया प्रमाणावर स्वयं रोजगार निर्मिती साठी करता येईल.

---